



दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
LOK AARAMBH
dainiklokaarambh@gmail.com
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले
बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | बुधवार १५ जानेवारी २०२५ | अंक ३६ • पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
९४०३६ ४१४८२
राहुल मारोतीराव वाईकर

## शिवजन्मोत्सव समितीच्या अध्यक्षपदी

### विक्रम पवार स्वागताध्यक्षपदी सचिन कदम यांची निवड



नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : किनवट येथील सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीच्या अध्यक्षपदी विक्रम पाटील पवार तर स्वागताध्यक्षपदी सचिन पाटील कदम यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. किनवट सार्वजनिक शिवजन्मोत्सवाची बैठक सोमवार दि.१३- जानेवारी रोजी गोकुंदा येथील शासकीय विश्रामगृहात संपन्न झाली.यावेळी बैठकीत सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीची कार्यकारिणी निवडण्यात आली.यात सर्वानुमते शिवजयंती उत्सवाच्या अध्यक्षपदी विक्रम पवार स्वागताध्यक्षपदी सचिन कदम कार्याध्यक्ष बबनराव वानखेडे उपाध्यक्ष ओम काकडे,पांडुरंग बादड,अरविंद कदम,आदित्य कदम, कोषाध्यक्ष निरंजन मिराशे प्रसिद्धी प्रमुख आकाश इंगोले तर कार्यकारणी सदस्य म्हणून रवींद्र केसरे ,भुजंग चव्हाण, अरुण दिवसे, अरविंद सूर्यवंशी, प्रकाश गोरे, रितेश मंत्री, अवधूत कदम, प्रदीप कोल्हे,गोविंद आरसोड , कृष्णा मुंगल , सारंग पवार ,कृष्णा सोमवंशी,लकी पवार , अमोल सोमवंशी, सोपान शिंदे ,महेश दिवसे,राज कानवटे,रोहित केसरे,यांची निवड करण्यात आली.यावेळी प्रा.रामप्रसाद तौर,वैजनाथ करपुडे पाटील,अनिल पाटील क-्हाळे, जेष्ठ पत्रकार फुलाजी गरड पाटील मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष प्रा.दगडू भरकड प्रवक्ते प्रा.शिवदास बोकडे, श्यामराव फाळके,श्री.भदाणे,ज्ञानेश्वर कदम,गंगाधर सोळंके,राजू शिंदे राजेश कदम, संदीप कोल्हे, सुशील कदम संजय पवार यांच्यासह समाजातील विविध संघटनांचे पदाधिकारी कार्यकर्ते शिवप्रेमी बांधव उपस्थित होते.

## गांधी बाल मंदिर मध्ये राष्ट्रीय युवा दिन साजरा..



१२ जानेवारी राजमाता जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद जयंती चे औचित्य साधून गांधी बाल मंदिर हायस्कूल मध्ये राष्ट्रीय युवा दिन साजरा करण्यात आला यावेळी स्वामी विवेकानंद यांचे विचार विद्यार्थ्यांसमोर मांडण्यात आले तसेच राजमाता जिजाऊ यांची स्वराज्याविषयी त्याचे प्रखर विचार विद्यार्थ्यांसमोर मांडण्यात करण्यात आले. यावेळी राजमाता जिजाऊ यांची भूमिका दृष्टी पुजारी तसेच स्वामी विवेकानंद यांची भूमिका देव याने खूप छान सदर केली . सदर कार्यक्रमात श्री अमोल जागले सर ,श्री अवधूत चव्हाण सर, सौ अर्चना सातपुते मॅडम, श्री रत्नकांत विचारे सर यांनी मोलाचे सहकार्य केले. सदर कार्यक्रमाचे आयोजन थ्री महाराष्ट्र बटालियन आर्मी युनिट यांच्यावतीने शाळेचे एन सी सी ऑफिसर श्री विश्वनाथ पांचाळ सर यांनी केले. सदर कार्यक्रमास शाळेचे पर्यवेक्षक श्री रवींद्र खोंडे सर, मुख्याध्यापक श्री अनिल पांचाळ सर यांनी अनमोल मार्गदर्शन केले.

# आता शत्रुची खैर नाही, आज देशाला मिळणार ३ शक्तीशाली युद्धनौका, खासियत काय?

## भारतीय नौदलासाठी आजचा दिवस महत्त्वाचा आहे. नौदलाच्या ताफ्यात एकाचवेळी तीन शक्तीशाली युद्धनौकांचा समावेश होणार आहे




पंतप्रधान नरेंद्र मोदी आज महाराष्ट्राच्या दौ-यावर आहेत. त्यांच्याहस्ते आज मुंबईच्या नौदल गोदीत आयएनएस सूरत, आयएनएस नीलगिरी या युद्धनौका आणि आयएनएस वाघशीर ही पाणबुडी देशाला समर्पित करण्यात येईल. नौदल ताफ्यात या तीन युद्धनौकांच्या समावेशाने भारताची सागरी सुरक्षा अधिक भक्कम होणार आहे. भारताच्या या तीन नवीन युद्धनौका किती शक्तीशाली आहेत आणि त्यांची खासियत काय हे आज या रिपोर्टमधून जाणून घ्या. बदलत्या परिस्थितीत या युद्धनौका भारतासाठी किती आवश्यक आहेत, ते सुद्धा समजून घेऊया.आयएनएस सूरत, आयएनएस नीलगिरी या युद्धनौका आणि आयएनएस वाघशीर या पाणबुडीच्या समावेशाने भारतीय नौदलाची क्षमत कैकपटीने वाढणार आहे. त्याशिवाय हे स्वदेशी निर्मितीच एक उत्तम उदहारण सुद्धा आहे. दोन युद्धनौका आणि पाणबुडी मुंबईच्या माझगाव डॉकमधील शिपबिल्डर्स लिमिटेडमध्ये (चऊढ) डिझाइन करुन बनवण्यात आल्या आहेत. यात आयएनएस सूरत ही स्टेल्थ गाइडेड-मिसाइल डिस्ट्रॉयर आहे. आयएनएस नीलगिरी प्रोजेक्ट १७ ए अंतर्गत बनवण्यात आलेली पहिली स्टेल्थ फ्रिगेट आहे. आयएनएस वाघशीर ही स्कॉर्पिन-क्लास सबमरीन आहे.तीन वर्षात बांधण्यात आलेली डिस्ट्रॉयरआयएनएस सूरत ही भारतीय नौदलाच्या प्रोजेक्ट १५बी अंतर्गत बनवण्यात आलेली चौथी आणि शेवटची स्टेल्थ गायडेड-मिसाइल डिस्ट्रॉयर आहे. अत्याधुनिक टेक्नोलॉजीने सुसज्ज असलेली ही युद्धनौका शत्रूवर अचूक प्रहार करण्यासाठी सक्षम आहे. आयएनएस सूरतच्या बांधणीची सुरुवात ७ नोव्हेंबर २०१९ रोजी झाली. १७ मे २०२२ रोजी ही युद्धनौका लॉन्च करण्यात आली. ही भारतीय नौदलाची आतापर्यंतची सर्वात वेगाने निर्मिती करण्यात आलेली स्वदेशी डिस्ट्रॉयर आहे.आयएनएस सूरतच वैशिष्ट्यया युद्धनौकेची लांबी १६४ मीटर आहे. स्टलेथ फिचर्स आणि अत्याधुनिक रडारने सुसज्ज असलेली ही युद्धनौका आहे. शत्रुला ही युद्धनौका सापडत नाही.ही युद्धनौका जमिनीवरुन जमिनीवर आणि जमिनीवरुन हवेत मारा करणारी मिसाइल्स, टॉरपीडो आणि अन्य शस्त्रांनी सुसज्ज आहे.आयएनएस नीलगिरी ब्लू वॉटर ऑपरेशनमध्ये किंगआयएनएस नीलगिरी ही भारतीय नौदलाच्या प्रोजेक्ट १७ए अंतर्गत बनवण्यात आलेली पहिली स्टेल्थ फ्रिगेट आहे. अत्याधुनिक टेक्नोलॉजी यामध्ये आहे. २८ डिसेंबर २०१७ रोजी या युद्धनौकेची बांधणी सुरु झाली. २८ सप्टेंबर २०१९ ही युद्धनौका लॉन्च झाली. आयएनएस नीलगिरीच्या समुद्री चाचण्या ऑगस्ट २०२४ मध्ये सुरु झाल्या. सर्व चाचण्या या युद्धनौकेने यशस्वीरित्या पूर्ण केल्या.आयएनएस नीलगिरीच वैशिष्ट्यही युद्धनौका १४९ मीटर लांब आहे.यात रडार सिग्नेचर कमी करण्यासाठी विशेष डिजाइनचा उपयोग करण्यात आला आहे.

## तर मी राष्ट्रपतींपर्यंत जाईल; सुरेश धस नेमकं काय म्हणाले?

आज अखेर वाल्मिक कराडवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली, या प्रकरणात सुरुवातीपासूनच आमदार सुरेश धस यांनी आक्रमक भूमिका घेतली होती. वाल्मिक कराडवर मकोका अंतर्गत कारवाई केल्यानंतर त्यांची पहिली प्रतिक्रिया आता समोर आली आहे. मकोका लावला आहे, ३०२ मध्ये देखील आरोपी झाले आहेत. खंडणीमध्येही आहेत, आता ते उद्या रितसर आत जातील असं सुरेश धस यांनी म्हटलं आहे.नेमकं काय म्हणाले सुरेश धस? मी भविष्य किंवा ज्योतिषी नाही मात्र त्या परिसरात विचारलं तर काय काय घटना घडली त्याचा व्हिडिओ रेकॉर्ड झाला आहे. मी अगोदर त्याबाबत सांगितलं होतं तो पोलिसांनी संबंधित कंपनीकडून प्राप्त करून घेतला असेल. पुढे कायदेशीर कारवाई होईल. माझ्याकडे पुरावे असायला मी काही जेम्स बाँड नाही, पुरावे पोलीस गोळा करत आहेत, महाराष्ट्राचे पोलीस सीआयडी हे जेम्स बाँड पेक्षाही प्रभावी आहेत.



दरम्यान कराड कुटुंबाकडून सुरेश धस यांच्यावर आरोप करण्यात आले आहेत. या आरोपांना देखील सुरेश धस यांनी उत्तर दिलं आहे. ते माझ्यावरती काही आरोप लावू शकत नाहीत त्यांना संविधानानं आंदोलन करण्याचा अधिकार दिला आहे. या पुढे जर कोणी कोणाची हत्या केली तर त्याच्या बाजुनं आंदोलन करण्याची नवीन प्रथा महाराष्ट्रात पडेल असा टोलाही यावेळी सुरेश धस यांनी लगावला आहे.
पुढे बोलताना ते म्हणाले की, मी अडकवायचा काय संबंध. पोलिसांना कडी लागल्यानंतर पोलीस त्यांना ताब्यात घेणारच, सगळं काही सापडले असेल पोलिसांना, कोणी धमकी दिली कोणी उचलून आणायचं सांगितलं? कोणी मारायचा सांगितलं? या सर्व गोष्टीचे आका हे वाल्मीक कराडच आहेत हे सिद्ध झालं आहे. माझा लढा राष्ट्रपतींकडे माफी नामा पाठवला तरी चालूच राहील. या मधील सर्वांना फाशीची शिक्षा व्हावी यासाठी हा सुरेश धस प्रयत्न करेल असं या प्रकरणावर बोलताना सुरेश धस यांनी म्हटलं आहे. दरम्यान दुसरीकडे वाल्मिक कराडवर मकोका अंतर्गत कारवाई झाल्यानंतर परळीमधील आंदोलन देखील चांगलंच पेटलं आहे.

## शाळेसाठी भंगार एसटी महामंडळाच्या बस रस्त्यावर; विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ?

नेकनुर प्रतिनिधी - परिवहन विभागाच्या काही बस या भंगार अवस्थेत निघाल्या आहेत. यामुळे चालकाच्या आरोग्याला धोका निर्माण होतो. शिवाय भंगारात जाण्या-या बस रस्त्यावर धावत असल्यानं प्रवाशांच्या आणि विद्यार्थ्यांच्या जीवाला धोका असतो. आज बाळनाथ विद्यालय चाकरवाडी या शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी ने - आण करणारी बस भंगार अवस्थेत असणारी बस आहे. शिवाय भंगारात जाण्या-या बस रस्त्यावर धावत असल्यानं प्रवाशांच्या जीवाला धोका असतो. परिवहन विभाग याला गांभीर्याने घेताना दिसून येत नाही. भंगार, नादुरुस्त बस रस्त्यावर एसटी महामंडळाच्या भंगार बसेसचा मुद्दा सातत्याने ऐरणीवर येत आहे. एसटी महामंडळाच्या भंगार आणि नादुरुस्त बसेसमुळे अनेक ठिकाणी अपघातांच्या घटना घडत आहेत. शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी सोडली जाणारी बस भंगार अवस्थेतलीच बस आहे. शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी



दररोज भंगार मधली बसच पाठवली जाते. या बस मधून विद्यार्थ्यांना जीवघेणा प्रवास सुद्धा करावा लागतो. कधी खिडकी नाही तर कधी त्या बसच्या खिडकीला काचे सुद्धा नाहीत. यामुळे लहान विद्यार्थी खिडकीमधून डोकावत सुद्धा असतात. परंतु आज शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी सोडल्या जाणारे बसचे वरील छतच उडून गेले आहे. यामुळे आता विद्यार्थी शाळेत वेळेवर पोहोचणार नाहीत. शाळेच्या होणा-या नुकसानीस परिवहन मंडळ जबाबदार राहणार का यावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. परंतु गेल्या अनेक दिवसांपासून शाळेसाठी कधी बस येते तर कधी नाही यासाठी अनेक वेळा संबंधित तिडके अधिकारी असणारे यांना शाळेचे मुख्याध्यापक जगताप सर यांनी तक्रार केली असता त्यांनी या तक्रारीला केराची टोपली दाखवल्याचे सुद्धा शाळेचे मुख्याध्यापक यांनी बोलताना म्हटले आहे. सतत शाळेसाठी भंगार बस आणि नादुरुस्त बसच पाठवली जाते. जर एखाद्या वेळेस शाळेसाठी येणारी बस ना दुरुस्त असेल भंगार असेल आणि या बसमधून विद्यार्थी जर प्रवास करत असतील तर दुर्घटना घडलीच तर परिवहन महामंडळ जबाबदार राहणार का ? विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानास कोण जबाबदार राहणार ? तिडके अधिकारी नेमक ऐकते कोणाचे ? शाळेसाठी असल्या नादुरुस्त बस पाठवल्या तर विद्यार्थ्यांना या बस मधून जीव घेणा प्रवास करावा लागत आहे. एसटी महामंडळ अशा भंगार बसेस रस्त्यावर चालवून प्रवाशांच्या जीवाशी खेळ करत आहे का ?, असा संतप्त सवाल आता पुन्हा एकदा विचारल्या जाऊ लागला आहे.

## महिलेच्या डोक्यावरील केसगळतीचा Video समोर, बुलढाण्यात परिस्थिती गंभीर

बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव तालुक्यातील काही गावांमध्ये केसगळतीचे प्रमाण प्रचंड प्रमाणात वाढले असून त्यावर अद्यापही काही उपाय सापडलेला नाही. दिवसेंदिवस केसगळतीची प्रकरणं वाढतंच चालली असून त्यामुळे गावक-यांमध्ये अतिशय भीतीचं वातावरण आहे.त्यातच आता एक महिलेच्या केसगळतीचा व्हिडीओ समोर आला आहे. गावातील एका महिलेचे केस अगदी सहजपणे हातात येत असल्याचे त्या व्हिडीओत दिसत आहे. दरम्यान याप्रकरणाचा तपास करण्यासाठी, केसगळतीचे नेमके कारण शोधण्याचा खउचठ- नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ एपिडेमियोलॉजीचे पथक बुलढाण्यात दाखल झाले असून शास्त्रज्ञांनी तपासणीस सुरुवात केली आहे.
टक्कल पडत असलेल्या महिलेचा धक्कादायक व्हिडिओ हातीशेगांव तालुक्यातील केस गळती प्रकरण पंधरा दिवसांपूर्वी समोर आल्यावर आजपर्यंत शेगांव सह नांदुरा तालुक्यात १५६ पेक्षा जास्त रुग्णांना टक्कल पडत असल्याचे आढळले आहे. मात्र , हे टक्कल कशामुळे पडत आहे, एवढी केसगळती कशामुळे होत आहे, याचा आरोग्य विभागाला अद्यापतरी शोध लागलेला नाही. याच दरम्यान एका महिलेच्या केसगळतीचा व्हिडीओ समोर आला असून,तिचे केस अगदी सहज हातात येत आहेत. बोंडगाव येथे पाहुणी म्हणून आलेल्या एका २५ वर्षीय महिलेच्या डोक्यावरील केस सहजपणे हातात येत असल्याचा एक धक्कादायक व्हिडिओ समोर आला आहे. या महिलेच्या डोक्यावरील केस हे सहजपणे हातात येत असून पूर्णपणे टक्कल पडले आहे यामुळे ग्रामस्थांमध्ये प्रचंड भीती असून भयावह स्थिती आहे.

# दाजीला भेटण्यासाठी आलेल्या तरुणाचा मांज्याने गळाच: राज्यात मांज्यामुळे कुठे कुठे झाल्या दुर्घटना?



आज मकरसंक्रांतीनिमित्त ठिकाठिकाणी पतंग उडवण्याची मोठी परंपरा आहे. मात्र पतंग उडवताना आता नायलॉनचा मांजा हा दिवसेंदिवस घातक ठरताना दिसत आहे. नाशिक शहरात नायलॉन मांजावर बंदी असताना देखील शहरात मांजाचा सर्रास वापर सुरू आहे. या नायलॉन मांजामुळे एका २३ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला आहे. सोनू किसन धोत्रे असे या तरुणाचे नाव आहे. नाशिकच्या पाथर्डी इंदिरानगर परिसरात ही घटना घडली. यासोबतच राज्यात अनेक ठिकाणी मांजामुळे विविध दुर्घटना घडल्या आहेत.नाशिकमध्ये तरुणाच्या गळ्यावर गंभीर जखममिळालेल्या माहितीनुसार, सोनू धोत्रे हा पाथर्डी इंदिरानगर भागातून जात असताना नायलॉन मांजाने त्याच्या गळ्यावर गंभीर जखम झाली. यामुळे तो गंभीररित्या जखमी झाला. यानंतर त्याला तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचार सुरु होण्यापूर्वीच त्याला डॉक्टरांनी मृत घोषित केले. या घटनेमुळे स्थानिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. नायलॉन मांजाच्या वापरामुळे वारंवार होणा-या अशा घटनांवर कठोर प्रतिबंध लावण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.सोनू धोत्रेचा नायलॉन मांजामुळे मोठा रक्तस्त्राव झाल्याने त्याचा मृत्यू झाला. आम्ही ज्या मांजामुळे ही घटना घडली, तो मांजा ताब्यात घेतला. सध्या हा तपास सुरु आहे. आम्ही मांजा विक्रेत्यांवर कारवाई केली आहे. आतापर्यंत ९ जणांवर कारवाई केली आहे. मांजा वापरणारे हे सर्व लोक सुशिक्षित आहेत. लवकरच यावर कारवाई केली जाणार आहे. त्यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून यांच्यावर कारवाई करणार आहेत.नाशिकमध्ये धर-पकड कारवाई सुरुतर दुसरीकडे नायलॉन मांजाने पतंग उडवणा-यांवर नाशिक पोलिसांची धर-पकड कारवाई सुरु केली आहे. नायलॉन मांजावर बंदी आहे. तरीदेखील मांजाचा वापर केला जात आहे. त्यामुळे ही कारवाई केली जात आहे. आज सकाळपासून पोलिसांची नाशिक शहरात कारवाई सुरू आहे. दोन दिवसांपूर्वी नायलॉन मांजामुळे गळा कापला गेल्याने तरुणाला ७५ टाके पडले होते.नागपुरात पोलीस कर्मचारी जखमी नागपूर पोलीस दलात कार्यरत महिला पोलीस कॉन्स्टेबल नायलॉन मांजामुळे जखमी झाल्या आहेत. शीतल खेडकर असं जखमी महिला पोलीस कर्मचारी यांचं नाव आहे. त्या सीताबर्डी पोलीस स्टेशनमध्ये कार्यरत होत्या. आज दुचाकीवरून ड्यूटीवर येत असताना नायलॉन मांजामुळे त्यांच्या नाकाला गंभीर दुखापत झाली. त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार केले असून प्रकृती धोक्याबाहेर आहे.
लासलगावात दाजीला भेटण्यासाठी आलेला तरुण जखमीदाजी आणि बहिणीला भेटण्यासाठी आलेल्या १६ वर्षीय युवकाचा बंदी असलेला नायलॉन मांजा गळ्याला अडकल्याने गळा चिरल्याची धक्केदायक घटना समोर आली आहे. लासलगाव-विंचूर रोडवर विंचूर येथील पार्वती स्टीलजवळ घडली आहे. नायलॉन मांजामुळे गळ्याला गंभीर जखम झाली आहे. रेहान शेख असे या तरुणाचे नाव असून त्याच्या गळ्याला डाव्या बाजूने ४१ टाके पडले आहेत.

बीड/महाराष्ट्र

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

बुधवार १५ जानेवारी २०२५
https://lokaarambh.com



सं पा द की य

## तिळगुळ घ्या आणि गोड गोड बोला !



तिळगुळ घ्या आणि गोड गोड बोला! असे उद्गार तोंडातून काढले की,अगदी बालपणीची आठवण येते कारण, संक्रात आली की,आईच्या, आजीच्या मागे वाण घेण्यासाठी धावत जायचे. पण आता सर्व विसरले ती फक्त मनात आठवण ठेवली आहे. तीन वर्षापासून कोरोनाचे संकट आले आहे. त्यामुळे आम्ही महिलावर्ग हळदी कुंकवाचा कार्यक्रम थोडा सांभाळूनच करतो. बरं का, असो आपण मुख्य विषयाकडे आता वळणार आहोत. मकरसंक्रांत हा सण सर्व नात्यांमध्ये मित्र-मैत्रिणींमध्ये आणि परिवारामध्ये गोडवा आणणारा गोड सण म्हणजे मकर संक्रांत होय

आपल्या देशात मकरसंक्रांतीला जरी वेगवेगळ्या नावाने ओळखले जात असले तरी या सणाची एकच प्रथा सर्व प्रदेशांमध्ये समान आहे आता प्रश्न पडला असेल? की, ही समान प्रथा कोणती ?ही समान प्रथा म्हणजे आपल्या सगळ्या नात्यांमध्ये गोडवा निर्माण करण्यासाठी एकमेकांना तिळगूळ वाटण्याची प्रथा आहे. आपल्याकडे या दिवशी तीळ आणि गूळ या दोघांना एकत्र बारीक करून वाटण्याची प्रथा प्रचलित आहे. हा तिळगुळ कुटुंबातील सदस्यांना, शेजा-यांना, नातेवाईकांना, मित्र-मैत्रिणींना वाटतात. तिळगुळाचे वेगवेगळे पदार्थ करून देखील वाटतात . तीळगुळ हे शांतता आणि आनंदी राहण्याचे प्रतीक मानले जाते. आपल्या महाराष्ट्रात एकमेकांना तिळगुळ वाटतांना तिळगुळ घ्या आणि गोड गोड बोला असे बोलण्याची प्रथा आहे. खरं तर मकर संक्रांति हा सण सूर्य देवतेला समर्पित केला जातो. शिवाय हिंदू धर्मामध्ये सूर्यदेवाला बहुमोल असेच महत्व आहे. आणि त्याचे वर्णन आपल्याला गायत्री मंत्राच्या स्वरूपात वेदात दिसून येते.

मकर संक्रांतीच्या दिवशी उत्तरायण चालू होते. आणि या उत्तरायणाचा सहा महिन्याचा काळ आपल्या हिंदू धर्मात शुभ मानला जातो. या दिवशी पवित्र नद्यांमध्ये स्नान केल्या केला जाते. काही लोक तिळ टाकुन स्नान करतात.असे स्नान केल्याने आपल्या पापाचा सर्वनाश होतो असे मानले जाते. स्त्रिया या संक्रातीच्या पवित्र दिवशी हळदी कुंकू चा कार्यक्रम करतात.ही प्रथा महाराष्ट्रात प्रचलित आहे. हळदीकुंकू समारंभाच्या दिवशी गावातील सर्व स्त्रिया एका ठिकाणी एकत्रित नटून-थटून जमा होतात. त्या दिवशी एकमेकींना हळदी कुंकू लावून प्रत्येकीला वाण म्हणून भेटवस्तू देतात आणि नव-याचे नाव उखाण्याच्या स्वरूपात घेण्याची प्रथा प्रचलित आहे. शेतकरी बांधव मकर संक्रांतीच्या वेळी रब्बी पिकाची सुरुवात करतो. म्हणून या दिवसाला खूप महत्व आले आहे. काही ठिकाणी ह्या दिवशी पतंग उडवितात. मकर संक्रांत हा पोष महिन्यात येणारा सण आहे.हा सण दरवर्षी १४किंवा १५ जानेवारीला येतो.या दिवसाची खूप मोठी आख्यीका सुद्धा प्रचलित आहे. माझे आजोबा मला नेहमी सांगायचे. फार वर्षापूर्वी संकरासूर नावाचा एक राक्षस होता. हा राक्षस लोकांना खूप त्रास द्यायचा त्याच्या अन्यायाला आणि अत्याचाराला लोक त्रासून गेली. या राक्षसाला मारण्यासाठी देवीने संक्रांतीचे रूप घेतले. व संक्रांतीदेवीने या संकरासुर राक्षस का वध केला.या राक्षसाचा वध झाल्याने लोकांच्या मनातील भीती दूर झाली.आणि ते सुखाने संसार करू लागले. या दिवशी सूर्यदेव धनू राशीतून मकर राशीत प्रवेश करतो. आणि त्या दिवशी उत्तरायणाला प्रारंभ होतो आणि उन्हाळा येण्याची चाहूल लागते. मकर संक्रांतीच्या दिवशी तीळाला फार महत्त्व असते. कारण हा काळ खूप थंडीचा असतो. आपल्या शरीरात उष्णता मिळविण्यासाठी तिळापासून वेगवेगळे पदार्थ बनवून खाल्ले जातात.घरातील वडीलधा-यांना तिळगुळ घ्या आणि गोड गोड बोलाअसे म्हणून त्यांचा आशीर्वाद घेतात काही प्रांतात वेगवेगळ्या पद्धतीने हा सण साजरा करतात .

**सौ. ज्योत्स्ना भास्कर बन्सोड**

# (खरंतर..मी खुप दिवसांनी घरी सापडलो होतो,त्यात हाताला डॉक्टरने राखी बांधलेली)

सर्वांना सप्रेम नमस्कार..! कालचा दिवस खरंच खुप भाग्याचा होता म्हणून लाखमोलाची माणसं लाभली!! *नक्कीच असतील पूर्वजन्मीचे बंध आपुले..त्याशिवाय का एकत्र खेचलो आपण? नभातल्या तारांगणात, कवींच्या आकाशगंगेकडे खेचलेल्या उपग्रहा सारखे!! कुटूंबाची गुरूत्वाकर्षण कक्षा ओलांडली..मग कसलं नेटवर्क? ..थेट काव्य अर्क..! येताना कारमध्ये म्हणजे दादूसच्या रथातच मैफील रंगली होती..! वर्दीतल्या त्या दर्दी भल्या माणसाने मला भारावून टाकले,आणि सुभाष सरांच्या त्या अहाहा.. अव्वल गझला..!,सुरेल आवाजात विडंबणाची गीते शिवाय त्यांचा जिवाभावाचा मित्र विजय यांची भारीच साथ..मी तिथेच चिंब भिजलो होतो..! मग पुढे.. नदी किनारी नमाई सरांचं सुरेल आवाजतलं गोड काव्य,कुलकर्णी साहेबांची भारदस्त काव्य उर्जा, डॉ.विरसेनांचे छोटेच पण सप्तरंगी मनतरंग, रोहीणी मॅडम व सोनाली मॅडम यांचा काव्य प्रीतीचे निर्मळ झरे,श्रीशैल सुतारांचे खट्याळ कारंजे,रमेश सरांच्या पाऊस- धारा, संतोष सरांचा भिजवणारा शब्द-धबधबा..आणि सोनूप्रमोदांच्या लयभारी निरनिराळ्या लाटांच्या अदांनी तर न्हाऊनच निघालो होतो.. ! शेवटी उशीर झाला तरी पाय निघत नव्हते..(मन खरंतर अजूनही तिथंच आहे, चोर नदीकिनारी..!) रमेश सर तुमचे मनापासून आभार..!आणि संतोष सर थोर तुमचे उपकार!! (खरंतर..मी खुप दिवसांनी घरी सापडलो होतो,त्यात हाताला डॉक्टरने राखी बांधलेली) त्यामुळे घरचे सगळे झोपेत असताना पहाटे गुपचूप हळूच बाहेर पडलो होतो..आणि आपोआप.. इकडे दुस-याच ग्रहावर पोहचलो!! तिथला अलौकीक आनंदअनुभव अविस्मरणीय आहे, मला देखील खरी दाद दिली त्याबद्दल ही आपले सर्वांचे मनापासून आभार..!! धन्यवाद

# स्वामी विवेकानंद जयंती राष्ट्रीय युवा दिन विशेष लेख

स्वामी विवेकानंद जयंती हा दिवस भारत सरकारने राष्ट्रीय युवा दिवस म्हणून घोषित केलेला आहे. यावरूनच स्वामी विवेकानंद यांचे तरुणांबद्दलचे प्रेरणादायी विचार किती महत्त्वाचे आहेत हे लक्षात येते. आपल्या भारत देशाला तरुण भारत असे म्हणतात. याचे कारण म्हणजे आपल्या देशाची असलेली एकूण लोकसंख्या यापैकी ६५% लोकसंख्या ही ३५ वर्षापेक्षा कमी वय असलेल्या लोकांची व ५०% लोकसंख्या ही २५ वर्षा पेक्षा जास्त वय असलेल्या लोकांची आहे. सरासरी चा विचार केला तर साधारण ५७.५% एवढी लोकसंख्या ही तरुण आहे. यामुळेच भारत हा जगातील एकमेव सर्वाधिक तरुण लोकसंख्या असलेला देश आहे. तरुण हा देशाची सर्वात मोठी संपत्ती व शक्ती आहे. तरुणांमुळे देश प्रगतीच्या उंच शिखरावर जात असतो. पण आपण आजच्या तरुणाईचा विचार केला तर आजचा तरुण हा कुठेतरी चुकीच्या दिशेला भरकट असल्याचे आपल्याला दिसत आहे. जसे की गुन्हेगारी, व्यसन, आई वडील व गुरुजनांचा तसेच मोठ्या व्यक्तींचा अपमान करणे, भांडण,मारामारी, वाद- विवाद, सोशल मीडियावर चुकीचे संदेश, चुकीच्या पोस्ट यामुळे निर्माण होणारी सामाजिक, राजकीय व धार्मिक तेढ यामुळे निर्माण होणारे भांडण, बेरोजगारी या सर्व चुकीच्या गोष्टी आजचा तरुण अडकलेला दिसतो व तो तरुण समाजात आदर्श तरुण न राहता कुठेतरी समाजात चुकीच्या पद्धतीने वागताना दिसत आहे. यामुळेच आजच्या तरुणांनी स्वामी विवेकानंद यांचे प्रेरणादायी विचार व युवा असा असावा याचे विचार जर आत्मसात केले तर निश्चितच आजचा तरुण योग्य मार्गाने लागेल. स्वामी विवेकानंदाच्या स्वप्नातील युवक असा असावा चेह-यावर तेज आहे, देहामध्ये शक्ती आहे, मनामध्ये उत्साह आहे, बुद्धीमध्ये विवेक आहे, हृदयामध्ये करुणा आहे, मातृभूमीवर प्रेम आहे, इंद्रियावर संयम आहे, मन ज्याचे स्थिर आहे, आत्मविश्वास दृढ आहे, इच्छाशक्ती प्रबळ आहे, धाडसाचे बळ आहे, सिंहासारखा निर्भय आहे, ध्येय त्याचे उच्च आहे, सत्य ज्याचा ईश्वर आहे, व्यसनांपासून मुक्त आहे, जीवनामध्ये शिस्त आहे, प्रेमळ ज्याचा सूर आहे, मानवता हेच कुळ आहे, गुरुजनांचा आदर आहे, पालकांवरती श्रद्धा आहे, दीनदुबळ्यांचा मित्र आहे, सेवेसाठी तत्पर आहे, देवा वरती भक्ती आहे, जीवनामध्ये नीती आहे, चारित्र्याचे ज्याचे शुद्ध आहे, तोच आदर्श युवक आहे.वरील सर्व बाबींचा जर आपण सखोल विचार केला तर आजच्या तरुणांनी याप्रमाणे आचरण केल्यास तरुणांना योग्य दिशा मिळेलच परंतू आजचा युवा देशाची समाजाची मोठी शक्ती बनेल.

## मी सौ. सोनाली फडके



एक दिवसीय काव्य पार्टी समूहातील सर्वांना माझा नमस्कार... साहित्य क्षेत्रात मी नवीन असल्याने ही काव्यसहल माझ्यासाठी नाविन्यपूर्ण अनुभवांनी ओसंडून वाहणारी ठरली... साहित्यात माणसाला कोणतेही दुःख विसरवण्याची ताकद आहे हे मला ख-या अर्थाने काल आपणा सर्वांच्या सहवासात पटले आहे ... अशी सहल व आपणासारख्या व्यक्तींचा सहवास हे खरेच दुख-या मनावरचे औषध आहे ...घरापासून लांब जाऊन अशा प्रकारे सहलीचा विलक्षण आनंद लुटण्याचा हा माझा पहिलाच अनुभव होता... समूहातील सर्व ज्येष्ठ सदस्यांकडून खूप काही शिकण्यासारखे होते... तसे सर्वांकडून च खुप काही शिकण्यासारखे होते... संतोष सर ,सुभाष सर , विजय सर, जयराम सर , श्रीशैल सर ह्यांच्या कडून कलेचा आनंद भरभरून कसा लुटावा हे शिकण्याजोगे आहे ...आपणा सर्वांकडून माझ्या काव्यसंग्रहा च्या झालेल्या कौतुकासाठी मी खुप खूप खूप आभारी आहे... अवर्णनीय क्षण मला आपणा सर्वांच्या सोबतीने अनुभवण्यास मिळाले ह्यासाठी खूप खूप धन्यवाद....

## त्रिसुत्रीमुळेच आपण सदर कार्यक्रम अतिशय छानसंपन्न करू शकलो.

दिनांक १२ जानेवारी २०२५चा रविवार मलेखन अनब मीफ या साहित्य संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सन्माननीय रमेश मारुती पाटील सर यांच्या संकल्पनेतून आज डोळखांब (ता.शहापूर जि.ठाणे) परिसरात अगदी निसर्गरम्य ठिकाणी निवडक साहित्यिकांच्या सहवासाने वनभोजन, काव्य मैफिल व इतर कला प्रदर्शन यांचा संयुक्त बेत आयोजित करण्यात आला. सदर ठिकाण मी राहत असलेल्या परिसरात येत असल्याने रमेश सरांनी या कार्यक्रमाला अनुसरून माझ्यावर जी जबाबदारी सोपवली होती त्या जबाबदारीला अनुषंगून मी सहआयोजकाच्या भूमिकेतून वावरत होतो. निसर्गातील योग्य सुरक्षित ठिकाणाची निवड, गावरान घरगुती पद्धतीचे उत्तम जेवण,नाश्ता चहा व इतर सटरफटर साधनसामग्रीची व्यवस्था करणे माझ्याकडे होते. मी ते यथायोग्य पार पाडण्याचा प्रयत्न केला. समुहात सहभागी सर्वच सदस्य दर्जेदार होते. प्रत्येकांनी आपापली ओळख व काव्य सादर करताना सर्वांनी छान दर्जेदार साहित्य यावेळेस प्रदर्शित केले. मात्र मला प्रा. नरेंद्र कदम (भाईदर)सरांची संकल्पना व सादरीकरण जास्त भावलं. सारे समुह सदस्य ज्या प्रसंगी एकत्र जमले होते,तो प्रसंग व ते स्थळ अंकित करून



एक पात्र प्रहसन अगदी दहा मिनिटात सादरीकरण करून सर्वांना लक्षात राहील असा प्रसंग उभा केला. सोबतच कुलकर्णी सरांनी शहापूर शहर व परिसराला अंकित धरून जे गीत सादर केलं ते फारच प्रेरक होतं. मी समूहातील सर्व सदस्यांचे मनापासून कौतुक करतो. सदर संकल्पना स्वीकारून सहभागी होऊन समुहाचा आनंद द्विगणित केल्याबद्दल मी सर्वांचे मनापासून धन्यवाद व्यक्त करतो. स्पेशल थँक्स रमेश सरांसाठी आहे. त्यांची संकल्पना माझी धडपड व आपल्या सर्वांचा आनंददायी सहभाग या त्रिसुत्रीमुळेच आपण सदर कार्यक्रम अतिशय छानसंपन्न करू शकलो. आपला सर्वांचा स्नेह निरंतर रहावा हीच सदिच्छा... धन्यवाद.. समुह सदस्य प्रमोद सूर्यवंशी,मुंबई सोनाली फडके,डोंबिवली विरसेन साळोखे.ठाणे रोहिणी जाधव. सांताक्रुझ जयराम पारधी - कर्जत विजय पिलकर- शहापूर सुभाष शिंदे - शहापूर नरेंद्र कदम -भाईदर सुभाष नाईक - भाईदर श्रीशैल सुतार - अंबरनाथ उत्तम कुलकर्णी - मीरारोड संतोष रामचंद्र जाधव शहापूर जि.ठाणे ७५०७०१५४८८

## मी सौ. सोनाली फडके



एक दिवसीय काव्य पार्टी समूहातील सर्वांना माझा नमस्कार... साहित्य क्षेत्रात मी नवीन असल्याने ही काव्यसहल माझ्यासाठी नाविन्यपूर्ण अनुभवांनी ओसंडून वाहणारी ठरली... साहित्यात माणसाला कोणतेही दुःख विसरवण्याची ताकद आहे हे मला ख-या अर्थाने काल आपणा सर्वांच्या सहवासात पटले आहे ... अशी सहल व आपणासारख्या व्यक्तींचा सहवास हे खरेच दुख-या मनावरचे औषध आहे ...घरापासून लांब जाऊन अशा प्रकारे सहलीचा विलक्षण आनंद लुटण्याचा हा माझा पहिलाच अनुभव होता... समूहातील सर्व ज्येष्ठ सदस्यांकडून खूप काही शिकण्यासारखे होते... तसे सर्वांकडून च खुप काही शिकण्यासारखे होते... संतोष सर ,सुभाष सर , विजय सर, जयराम सर , श्रीशैल सर ह्यांच्या कडून कलेचा आनंद भरभरून कसा लुटावा हे शिकण्याजोगे आहे ...आपणा सर्वांकडून माझ्या काव्यसंग्रहा च्या झालेल्या कौतुकासाठी मी खुप खूप खूप आभारी आहे... अवर्णनीय क्षण मला आपणा सर्वांच्या सोबतीने अनुभवण्यास मिळाले ह्यासाठी खूप खूप धन्यवाद....

# मनोवैद्य विरसेन सालोखे सर आपणही सुंदर वेडीवाकडी रचना केली छान वाटलं- श्रीशैल सुतार

नमस्कार सर्वांना, रविवार १२ जानेवारी २०२५ आगळावेगळा कवी संमेलनाचा कार्यक्रम अतिशय उत्कृष्ट झाला.मी पहिल्यांदाच अशा प्रकारे संमेलन होताना पाहिलं. आपण नेहमी संमेलनास जातो तेव्हा प्रस्तावना नको,३ मिनिटे वेळ हे ठरलेले असते कारण कवींची सहभागी संख्या ५०-१०० असते. पण काल कुठलेही बंधन जाणवलं नाही दाद तर सगळ्यांनी

उत्स्फूर्त दिली आणि मस्ती, धिंगाणा, शायरी,नृत्य,अभिनय,गायन, केले वाद्य सारं काही एकाच पंक्तीत आलं असा कालचा दिवस. मी विशेष आभार रमेश पाटील यांचे मानू इच्छितो की त्यांनी मला येण्याचा आग्रह केला. तसेच शहापूर, डोळखांब येथे पहील्यांदाच प्रवास तोही दुचाकीवर यासाठी जयराम पारधी सरांचे आभार आणि सर्व नियोजन उत्तम केल्याबद्दल आमचे मित्र संतोष जाधव यांचेही मनःपूर्वक आभार! सोनाली मॅडम,रोहिणी मॅडम आपण इतक्या दूर केवळ कवितेसाठी आलात त्यासाठी आपले विशेष कौतुक, आमचे सोनू निगम अर्थात प्रमोद सर यांच्या आवाजाचा मी नेहमीच चाहता आहे. नमाई सुभाष सर यांची काल भेट झाली भारी वाटले सर तुमचाही आवाज तितकाच गोड आणि संयमी. उत्तम कुलकर्णी सर नावाप्रमाणेच अगदी उत्तम स्वभाव आणि कविता सुद्धा. गझलेचा बादशहा सुभाष शिंदे सरांच्या रचनेतून खूप काही ऐकायला मिळालं आणि त्यांचाही आवाज जबरदस्त आणि सोबत पिळकर साहेब आपण तर कुर्बानी देऊन आलात आपली रचना,आपला मैत्र भाव कायम स्मरणात राहील. नरेंद्र सरांची ती चोर नदीची कविता डोळ्यात पाणी आणून सोडलं आणि मनोवैद्य विरसेन सालोखे सर



आपणही सुंदर वेडीवाकडी रचना केली छान वाटलं त्याहून सुंदर हे की ६४००० मनोरुग्ण तुम्ही हाताळत आहात.या. संमेलनासाठी एकूण एक मेहनत घेणारे सर्व जण आपले मनस्वी आभार एक सुंदर निसर्ग, काव्यमैफिल पहायला मिळाली.... अविस्मरणीय.... झाडे,नदी,खडक,वाळलेल्या आणि हिरव्या पाती, मुबलक पाणी, सुग्रास जेवण, शीतपेय, कविता ,गप्पा,गझला रंगल्या दुपार टळली आणि कातरवेळी गाण्यांचा आवाज, सूर्य जरी मावळला तरी कवितेचा आनंद मात्र विझला नव्हता थांबावी वाटत होती ती संध्याकाळ ती कातरवेळ ती रजनी अशीच....... कवी श्रीशैल सुतार, सोलापूर सगळ्यात महत्वाचं माझ्याकडून बोलताना काही चूक भूल झाली असेल तर माफी करावी आपलाच श्रीशैल सुतार

# जगात पहिल्यादाच झालेल्या फुले फेस्टीव्हलमध्ये १५०० हूनअधिक कवी, रसिक फुले प्रेमींनी हजेरी लावली.




नुकताच २ ते ५ जानेवारी दरम्यान पुणे येथे एस. एम. जोशी सभागृहात हा फेस्टिव्हल थाटात संपन्न झाला. कवी विजय वडवेराव आयोजित भिडेवाडा देशातील मुलींची पहिली शाळा काव्य जागर अभियान अंतर्गत काव्य महोत्सव, महिला सक्षमीकरणासाठी लाठीकाठी, दांडपट्टा प्रात्यक्षिक, सांगितिक पोवाडे सादरीकरण, एकपात्री प्रयोग, गझल मुशायरा असा भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.६०० हुन अधिक कवींना भारतीय संविधान ग्रंथ, फुलेप्रेमी पेन, सन्मानचिन्ह, सहभाग प्रमाणपत्र भेट देण्यात आले.क्रांतीसूर्य ज्योतिराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्री बाई फुले यांच्या विचारांचा वारसा ,वसा घेऊन कार्य करणा-या हातांना बळ देण्यासाठी, कार्याला गती प्रोत्साहन मिळावे म्हणून या फेस्टीव्हलमध्ये २५ आंतरराष्ट्रीय फुले प्रेमी समाज रत्न पुरस्कारांचे पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.जुन्नर शंकरराव बुट्टे पाटील विद्यालयाच्या शिक्षिका ,कवयित्री, लेखिका सरिता म्हेत्रे कलढोणे यांना फुलप्रेमी समाज रत्न पुरस्काराने गौरविण्यात आले. पुरस्कार प्राप्त झाल्यामुळे समाजातील शैक्षणिक, साहित्यिक मान्यवरांकडून त्यांचे कौतूक होत आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
बुधवार १५ जानेवारी २०२५
https://lokaarambh.com

# भारत कवितके महाराष्ट्र जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित.



रविवार दिनांक १२ जानेवारी २०२५ रोजी पुणे पत्रकार भवन येथे स्वराज्य जननी राजमाता जिजाऊ आणि युगपुरुष स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त पत्रकार साहित्यिक गीतकार सामाजिक कार्यकर्ता भारत कवितके मुंबई कांदिवली पश्चिम यांना त्यांच्या साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी बद्दल महाराष्ट्र जीवन गौरव पुरस्कार २०२५ मान्यवरांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले.विसावा सोशल फाउंडेशन आणि हिरकणी महिला विकास संस्था पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे येथे राष्ट्रीय युवा सामाजिक संमेलन आयोजित करण्यात आले होते.यावेळी कला, संस्कृती, साहित्य, सामाजिक, शैक्षणिक, पत्रकारिता,अशा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणा-या पुरुष व महिला यांना राष्ट्रीय युवा सामाजिक संमेलनात पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.भारत कवितके यांचा हा ११५६ वा पुरस्कार असून ही पुरस्कार संख्या पत्रकारिता साहित्य गीतकार,व सामाजिक क्षेत्रात विशेष कामगिरी केल्याने मिळाले आहेत,सांज, माझ्या गावाच्या दिशेने, आकाश तारकांचे, अरे मी एकटा, शोधतो मी किनारा,मी एक वृत्तपत्र लेखक, आणि आयुष्य उसवताना हे आत्मचरित्र प्रकाशित झाले आहेत धन्यवाद.तर उन्हाची सावली, हरवलेले क्षण हे दोन काव्य संग्रह प्रकाशनाच्या मार्गावर आहेत.भारत कवितके यांचे मूळ गाव पंढरपूर आहे, लहान पणापासून अत्यंत संघर्ष मय परिस्थिती तून यशस्वी झालेले भारत कवितके साहित्यिक म्हणून संवेदनशील आहेत पण पत्रकार म्हणून निर्भिड, बेधडक पणे वावरताना दिसतात.आयुष्य उसवताना हे त्यांच्या स्वतःच्या संघर्ष मय जीवनावर वास्तव दर्शविणारे आत्मचरित्र साहित्य जगत मध्ये फारच लोकप्रिय झाले आहे.या आत्मचरित्राला तीन राज्य स्तरीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत.या पुरस्कार सोहळ्यात अध्यक्षा भूमाता ब्रिगेड यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की,‌ देवाने कधीही महिला पुरुष मध्ये भेदभाव केला नाही, त्यासाठी मी आंदोलन केले व यशस्वी झाले. टिका विरोधकांना घाबरून घरी बसू नका, इच्छा शक्ती प्रबळ असायला हवी.पुरस्कार मिळाले आता आणखी चांगली कामगिरी करा.‌ या पुरस्कार सोहळ्यास तृप्ती देसाई, अभिनेता ध्रुव दातार, अनिल वेदपाठक, संदीप राक्षे,स्वाती तरडे,खरात सर, आयोजक संयोजक शर्मिला नलावडे व विविध क्षेत्रातील पुरस्कार्थी पुरुष व महिला आणि त्यांचे नातेवाईक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# गावगाडाकर साहेबराव नंदन तात्या व ॲड. संभाजीराव पगारे राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित



नाशिक गिरणा गौरव प्रतिष्ठान आयोजित अखिल भारतीय शेकोटी लोककला साहित्य संमेलनात नाशिकचे जेष्ठ उद्योजक देवकिसनजी सारडा साहित्य नगरी भावबंधन मंगल कार्यालय पंचवटी नाशिक येथे संपन्न झालेल्या शेकोटी पुरस्कार सन्मान सोहळ्यात, गावगाडाकर लेखक कवी साहेबराव नंदन तात्या यांच्या परिसस्पर्श कादंबरीला राज्यस्तरीय निळुभाऊ फुले वा:ङ्मय साहित्य पुरस्कार प्रदान करण्यात आला तर ॲड. संभाजीराव पगारे यांच्या हळवे मनाचे हुंकार या काव्यसंग्रहाला स्मिता पाटील शब्द पेरा पुरस्कार प्रदान करण्यात आला. लेखक साहेबराव नंदन तात्या व कवीवर्य ॲड. संभाजीराव पगारे या साहित्यिक द्वयींना जेष्ठ साहित्यिक मा. श्रीकांत बेनी, मा. प्रा. लक्ष्मण महाडिक शेकोटी कवी संमेलनाध्यक्ष, मा. शिक्षक आ. नानासाहेब बोरस्ते, मा. उत्तम कोळगावकर आकाशवाणी वृत्तनिवेदक, ग्रामिण कवी लेखक साहित्यिक मा. विजयकुमार मिठे, संमेलनाचे आधारवड माणूसमित्र सुरेश पवार, यांच्या शुभ हस्ते शेकडो साहित्यिकांच्या उपस्थितीत झालेल्या शानदार सोहळ्यात पुरस्कार देऊन, सत्मानित करण्यात आले. या प्रसंगी सगर समाजमित्र अशोक त्र्यं. पाटील, ज्ञानसिंधु प्रकाशनाचे तान्हाजी खोडे, यांची प्रेक्षकात विशेष उपस्थिती होती. लेखक साहेबराव नंदन तात्या व कवीवर्य ॲड. संभाजीराव पगारे यांचे विविध क्षेत्रातून अभिनंदन होत आहे.

# कोकण युवा संस्था आयोजित कोकण सुंदरी महाअंतिम फेरी




कोकणातील महिला भगिनींना एक व्यासपीठ मिळवून देण्यासाठी कोकण युवा संस्था आयोजित कोकण सुंदरी स्पर्धा आयोजित केली होती या स्पर्धेमध्ये कोकणपट्ट्यातील महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला या स्पर्धेची महाअंतिम फेरी फेरीचा कार्यक्रम रविवार १९ जानेवारीला कोकण नगर व्यायाम शाळेचे पटांगण भांडुप( प) येथे सायंकाळी पाच वाजता आयोजित करण्यात आला आहे.आहे सदर कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून मराठी चित्रपट मालिका आणि नाट्य अभिनेते स्टार प्रवाह वरील ‌सुख म्हणजे नक्की काय असतं‌ मालिका फेम गणेश रेवडेकर दादा प्रमुख उपस्थित राहणार आहेत.कोकण युवा संस्था ही मागील तीन वर्ष विविध सामाजिक महत्वकांक्षी उपक्रम राबवीत आहे कोकण युवा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष- अभिजीत कोटकर सचिव - अनिल गावडे ,उद्योजक लॉबी प्रमुख - रुपेश कोलते खजिनदार संजना बेंद्रे आणि सर्व सर्व सदस्य अतिशय मेहनत घेत आहेत. ह्यावेळी समाजातील विविध जक्षेत्रातील मान्यवर प्रतिष्ठित व्यक्ती उपस्थित राहणार आहेत. सदर कार्यक्रमाची रूपरेषा अतिशय नियोजनबद्ध असून यामध्ये कोकण सुंदरी स्पर्धा निकाल व बक्षीस, उद्योजक लॉबी, वेबसाईट प्रक्षेपण , कलाकृती फाईन आर्ट ड्रॉइंग प्रदर्शन भांडुपमधील जाखडी नृत्य, फॉरेनची पाटलीन, लकी ड्रॉ, सन्मानिय व्यक्तींचा सत्कार , जिव्हाळा वृद्धाश्रमची सुरुवात इत्यादी कार्यक्रम अतिशय उत्साहात व आनंदात संपन्न होणार आहेत तरी सर्वांनी उपस्थित राहावे असे आवाहन कोकण युवा संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे

# भिडे वाडा कार कवी विजय वडवेराव आयोजित

## देशातील पहिली मुलींची शाळा आंतरराष्ट्रीय काव्य जागर अभियानांतर्गत पहिले आंतरराष्ट्रीय फुले फेस्टीवल



यात विमलाबाई लुंकड विद्यालयातील शिक्षिका फुलेप्रेमी कवयित्री कांचन मून (भरणे) हडपसर पुणे व फुलेप्रेमी कवयित्री वर्षा सतिश शिंदे गुलटेकडी पुणे या दोन शिक्षिका यांना भिडेवाडाकार कवी फुलेप्रेमी विजय वडवेराव यांच्या हस्ते आंतरराष्ट्रीय फुलेप्रेमी समाजरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच विमलाबई लुंकड विद्यालयातील शिक्षिका संगिता भाऊ चौधरी व सुनिता किसन पवार यांनी आपल्या स्त्री शिक्षण देशातील पहिली मुलींची शाळा भिडे वाडा व सावित्रीबाई फुले यांच्यावर आधारित कविता सादर केली.यांचा सन्मान संविधान,पेन व सन्मानचिन्ह देऊन

फुलेप्रेमी कवी विजय वडवेराव सर यांनी केले.सर्व शिक्षक मुख्याध्यापक यांनी अभिनंदन केले.विमलबाई लुंकड विद्यालयातील मुख्याध्यापक संदिप मनोहर सातपुते यांनी व शाळेतील सर्व सहशिक्षकांनी सर्व शिक्षकांचे अभिनंदन केले. दिनांक २/०१/२०२५ ते ५/०१/२०२५ या कालावधीत एस एम जोशी सभागृह गांजवे चौक या ठिकाणी जगातील पहिले आंतरराष्ट्रीय फुले फेस्टीवल २०२५ भिडेवाडाकार कवी फुलेप्रेमी विजय वडवेराव आयोजित देशातील पहिली मुलींची शाळा आंतरराष्ट्रीय काव्यजागर अभियानांतर्गत या फेस्टीवलचे आयोजन करण्यात आले होते.यात फुले प्रेमी शिक्षिका वर्षा शिंदे मॅडम यांनी स्वतः रचलेला भिडेवाडा देशातील पहिली मुलींची शाळा या विषयावर आधारित पोवाडा व मी सावित्री बोलते हे एकपात्री नाटक सादर करण्यात आले. सादरीकरणात इयत्ता पाचवी, सहावी व सातवी चे विद्यार्थ्यांचा सहभाग होता व फुले प्रेमी शिक्षिका कांचन मून (भरणे) यांनी सहकार्य केले.तसेच या फेस्टीवल मध्ये शिक्षिका कांचन मून यांनी ज्ञानाई सावित्रीमाई व भारतीय मुस्लिम पहिली शिक्षिका माई फातिमा शेख यांची वेशभूषा केली होती. या फेस्टीवल मध्ये जगभरातून एकुण २५ फुलेप्रेमी कवी कवयित्री यांना आंतरराष्ट्रीय फुलेप्रेमी समाजरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.या फेस्टीवल साठी जगभरातून अनेक फुलेप्रेमी कवी कवयित्री व श्रोते उपस्थित होते.

# ठाणे ते वीर रेल्वे स्टेशन पर्यंत रेल्वे लोकल सेवा त्वरीत चालू करावी

ठाणे ते वीर रेल्वे स्टेशन पर्यंत रेल्वे लोकल सेवा त्वरीत चालू करावी तसेच कोकण रेल्वेच्या सर्व जलद एक्सप्रेस गाड्यांना रेल्वे स्थानकात (वीर ) स्टेशन थांबा मिळावा अशी बरीच वर्षापासूनची तेथील स्थानिक लोकांची मागणी आहे कारण रायगड जिल्ह्यातील व महाड तालुक्यातील जवळचे महत्वाचे रेल्वे स्टेशन आहे यातील वीर स्टेशन पासून ४० किलोमीटर अंतरावर हिंदू स्वराज्य निर्माण करणारे व महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी रायगड किल्ला आहे तसेच त्यांची समाधी स्थळ सुद्धा हे रायगडवर आहे त्याचप्रमाणे रायगड किल्यांच्या १ किलोमीटर अगोदर पाचाड येथे राजमाता जिजाऊ माँ साहेब यांची सुद्धा समाधी आहे तसेच पाचाड गावा अगोदर ७ किलो मीटर अंतरावर छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्या दोन्ही कन्या सर सेनापती श्री हिरोजी परसोजी राजे महाडीक अर्थात त्यांचे जावई यांचे गाव खर्डी हे आहे तसेच वीर स्टेशन पासून थोड्याच अंतरावर पांडवांची लेणी गांधारपाले हे ठिकाण आहे तसेच वीर स्टेशन पासून १७ किलोमीटर अंतरावर महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी पाण्याचा जो पहिला सत्याग्रह केला ते चवदार तळे तसेच क्रांती भूमी व महाड बाजार पेठ आहे तसेच वीर स्टेशन पासून ४० ते ४५ किलोमीटर अंतरावर श्री समर्थ रामदास स्वामी महाराजांची शिवथर घळ ( मठ ) आहे असे अनेक ऐतिहासिक वारसा लाभलेला हे वीर स्टेशन जवळ आहे तसेच गणपती उत्सव व शिमगा उत्सवात येथील चाकरमानी मोठ्या प्रमाणावर ये जा करीत असतात तसेच आता नवी मुंबई येथील विमान तळ सुद्धा लवकरात लवकर सुरू होत आहे त्यामुळे तेथील स्थानिकांची ही मागणी गेली कित्येक वर्षे करीत आहे तसेच अनेक पर्यटक ह्या पासून वंचित आहे म्हणून येथे होणारी स्थानिकांची व पर्यटकांची गैरसोय दूर व्हावी ही येथील लोकांची प्रमुख मागणी व पर्यटकांची मागणी जोर धरू लागली आहे तरी प्रशासनाने व स्थानिक आमदार खासदार यांनी लक्ष द्यावे ही नम्र विनंती आपले नम्र श्री गुरुदत्त वायकर मुंबई भांडूप (पश्चिम )

# बालकुमार साहित्य संस्थेच्या अध्यक्षपदी संदीप वाघोले

## बालकुमार साहित्य संस्थेच्या जुन्नर शाखेची कार्यकारणी जाहीर



ता. १२ पुणे : अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्थेच्या जुन्नर शाखेची कार्यकारणी नुकतीच जाहीर करण्यात आली. यात संदीप वाघोले यांची बालकुमार साहित्य संस्थेच्या जुन्नर शाखेच्या अध्यक्षपदी निवड झाली असल्याची माहिती केंद्रीय कार्यकारिणीचे अध्यक्ष माधव राजगुरू यांनी नुकतीच दिली. यावेळी कार्याध्यक्ष अनिल कुलकर्णी, कोषाध्यक्ष संजय ऐलवाड, कार्यकारिणी सदस्य सचिन बेंडभर, शिवाजी चाळक आदी मान्यवर उपस्थित होते.

अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्थेच्या जुन्नर शाखेची कार्यकारणी नुकतीच जाहीर करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष माधव राजगुरू यांच्या अध्यक्षतेखाली व कार्याध्यक्ष अनिल कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या बैठकीत अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्थेच्या जुन्नर शाखेची नूतन कार्यकारणी तयार करण्यात आली. यात अध्यक्ष संदीप वाघोले, कार्याध्यक्ष बाबासाहेब जाधव, उपाध्यक्ष अनिल कुटे, प्रमुख कार्यवाह संतु जेडगुले, कोषाध्यक्ष प्रशांत शेटे , प्रमुख सल्लागार जालिंदर मामा डोंगरे तर कार्यकारणी सदस्य मीनाक्षी वाकचौरे, मीरा हाडवळे, वैशाली सावंत यांची निवड करण्यात आल्याची माहिती अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्थेच्या केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य शिवाजी चाळक यांनी दिली.

जुन्नर तालुक्यात बालकुमारांसाठी निबंध, वक्तृत्व, काव्य अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार असून विजेत्या विद्यार्थ्यांना रोख रक्कमेसह बक्षीस देण्यात येणार असल्याचे अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्थेचे जुन्नर शाखेचे नवनिर्वाचित अध्यक्ष संदीप वाघोले यांनी सांगितले.

# इंडियन पोलीस मित्र मंडळाच्या जिल्हा अध्यक्ष पदी गजानन जाधव यांची नियुक्ती



डि.एस. राठोड फाऊंडेशन व मार्शल योगा अकॅडमी संचालीत, इंडियन पोलीस मित्र या सामाजिक संस्थेच्या जिल्हा अध्यक्ष पदी अंचरवाडी ता . चिखली जि बुलढाणा यांची निवड मुख्य अधिकारी महाराष्ट्र पोलीस मित्र,डॉ. सुरेश राठोड आणि महासंचालक डॉ. कृष्णा देवगीरी यांनी एका नियुक्ती पत्राव्दारे केली आहे . गजानन जाधव हे सामाजिक क्षेत्रात अग्रेसर असून पोलीस आणि समाज समस्या, यांच्यात समरसता व्हावी गुहेगारी कमी व्हावी तसेच समुपदेशन या हेतूने इंडियन पोलीस मीत्र काम करीत असून महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात शाखा आहेत . गजानन जाधव हे सामाजिक कार्यकर्ते असून याचबरोबर चित्रपट कलावंत देखील आहेत, त्यानी अनेक चित्रपट लघुपट, सिरीयल मध्ये दमदार भूमिका केल्या आहेत .तसेच नाट्य कला, सांस्कृतिक कार्यक्रम करीत आहेत . त्यांच्या या निवडीमुळे त्यांच्यावर मित्रमंडळी गावकरी यांच्या कडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे .

# ६जानेवारी या पत्रकार दिनाचे औचित्य साधून ठाणे जिल्हा वृत्तपत्र लेखक संघातील वृत्तपत्र लेखक व पत्रकारांचा जनजागृती सेवा संस्थेच्यावतीने सत्कार

-कल्याण(गुरुनाथ तिरपणकर)जनमनाचा कनोसा घेणारा वृत्तपत्र लेखक पत्रकारितेतील एक अविभाज्य घटक आहे.पत्रलेखक राजकीय,शैक्षणिक,सांस्कृतिक,सामाजिक अशा विविध विषयांवर सडेतोडपणे आपल्या लेखन शैली द्वारे विचार व्यक्त करत असतो.आता बरेचसे वृत्तपत्र लेखक कवी,पत्रकार,संपादक आहेत.त्याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.६जानेवारी या पत्रकार दिनाचे औचित्य साधून जनजागृती सेवा संस्थेच्यावतीने ठाणे जिल्हा वृत्तपत्र लेखक संघातील पत्रकार,वृत्तपत्र लेखक,कवी यांचा छोटेखानी सत्कार समारंभ कल्याण येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यानात आयोजित करण्यात आला होता.सर्व प्रथम प्रमुख पाहुणे ॲन्टीपायरसी सेल मुंबई चे तपाशी अधिकारी रामजित गुप्ता सर व समता साहित्य अकादमीचे महाराष्ट्र चे अध्यक्ष,राष्ट्र



पती पदक पुरस्कार प्राप्त दिलीप नारकर सर यांचे संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांनी शाल,श्रीफळ,भेटवस्तू,गुलाब पुष्प देऊन स्वागत केले.यावेळी संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांनी प्रास्ताविक केले.त्यानंतर ठाणे जिल्हा वृत्तपत्र लेखक संघातील पत्रकार,कवी,वृत्तपत्र लेखक प्रा.उदय सामंत,विवेक मालशे,दिवाकर गोळपकर,सुनिल इंगळे,नाना म्हात्रे,आर. एन.पिंजारी,सुधाकर कांबळी,सुनिल झळके,मनोहर गायकवाड,आनंदराव देसाई,बी.डी. गायकवाड,आशा पडवळ,सुरेखा गावंडे,अनिता कळसकर यांचा प्रमुख पाहुणे रामजीत महादेव गुप्ता व दिलीप नारकर यांच्या हस्ते शाल,नोटंगी डायरी,कुळकर्णी ब्रदर्सचे पॉकेट कॅलेंडर,संस्थेचा अहवाल,गुलाब पुष्प,पेन बॉक्स अशा स्वरुपात आकर्षक‌सन्मानपत्र ‌प्रदान करुन यथोचित सत्कार करण्यात आला.यावेळी दिवाकर गोळपकर,प्रा.उदय सामंत,सुनिल झळके,अनिता कळसकर यांनी आपले विचार व्यक्त केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डोंबिवली येथील मिठाईचे व्यापारी कुळकर्णी ब्रदर्स,सामाजिक कार्यकर्त्या कल्याण वाक्कर,सुनिल इंगळे,संस्थेचे खजिनदार दत्ता कडुलकर यांचे विशेष सहकार्य लाभले. शेवटी संस्थेच्या विनंतीला मान देऊन सर्व मान्यवर उपस्थित राहिल्याबद्दल अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांनी सर्वांचे आभार मानले.

# नाशिक पंचवटी येथे गिरणा गौरव प्रतिष्ठानचे तिसरे अखिल भारतीय शेकोटी लोककला साहित्य संमेलन जल्लोषात पार पडले.

भारत कवितके मुंबई कांदिवली पश्चिम शुक्रवार दिनांक १० जानेवारी व शनिवार दिनांक ११ जानेवारी २०२५ रोजी नाशिक पंचवटी येथील भावबंधन मंगल कार्यालय मधील जेष्ठ उद्योगजक देवकिशनजी सारडा साहित्य नगरीत दोन दिवसीय तिसरे अखिल भारतीय शेकोटी लोककला साहित्य संमेलन मोठ्या उत्साहात जल्लोषात पार पडले,या साहित्य संमेलनात जेष्ठ साहित्यिक डॉ.शंकर बोराडे पुरस्कार तमाशा सम्राट रघुवीर खेडकर यांना प्रदान करण्यात आला.सकाळी १० वाजता ग्रंथ दिंडी ने संमेलनाची सुरुवात झाली.प्रेरणा फाऊंडेशन महिला मंडळांनी मंगळागौर सादर केली, रामकृष्ण हरी महिला यांनी भजनाचा भक्ती प्रधान कार्यक्रम सादर केला,तर प्रयास फाउंडेशनच्या दिव्यांग मुला मुलींनी शिक्षकांनी महाराष्ट्र लोकगाथा मध्ये विविध पारंपरिक गाणी सादर केली. दुपारी १२ वाजता उद्घाटक रघुवीर खेडकर यांच्या हस्ते शेकोटी प्रज्वलन करून पूजन करण्यात आले, यावेळी संमेलनाचे अध्यक्षा प्रा.सुमती पवार, स्वागताध्यक्ष अड. नितीनभाऊ ठाकरे, शिवकन्या बढे, लावणी सम्राज्ञी माधुरी पवार, तमाशा महोत्सव अध्यक्ष वसंतराव जगताप,गिरणा गौरव प्रतिष्ठान चे अध्यक्ष सुरेश पवार, कार्याध्यक्ष रविंद्र मालुंजकर , संयोजक किरण सोनार व संजय आहेर, पत्रकार साहित्यिक गीतकार भारत कवितके सह महाराष्ट्र राज्यातील कवी लेखक गीतकार लोक कलावंत मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.शेकोटी भोवती महिला व पुरुष यांनी फेर धरला नृत्य केले.संमेलन उद्घाटक सत्कार मूर्ती तमाशा सम्राट रघुवीर खेडकर म्हणाले की ‌ मी माझ्या तमाशा तर नेहमीच राजा असतो,पण आज मात्र मी या संमेलनात विद्यार्थी आहे,मी माझ्या बंधनात रमराण असतो,१९६९ पासून मी तमाशात काम करतो आणि आपल्या जीवनातील संघर्षाबद्दल अनेक गोष्टी रसिकांना सांगितल्या.दुपारी लावणी स्पर्धा सुरु झाली,याचे सूत्र संचालन प्रतिभा



सोनार यांनी केले तर परीक्षक म्हणून जिर्तेंद्र चव्हाण उपस्थित होते, लावणी सम्राज्ञी माधुरी पवार यांनी लावणी नृत्य करून रसिकांची परमाईश पूर्ण केली.या लावणी स्पर्धेत अनेक लावण्यवती नी सहभाग घेतला होता.यातील लावण्यवती डॉक्टर, वकील,व उच्च शिक्षित होत्या.यामध्ये प्रथम क्रमांक वैष्णवी पाटील यांनी अहो शेठ लयं दिसांनी झालीय भेट या लावणी वर पटकावला, दुसरा क्रमांक सानिका बागुल यांच्या ईष्काचा बाण या लावणी ला तर तिसरा क्रमांक सोनाली सूर्यवंशी यांना पोटासाठी नाचते मी पर्वा कुणाची या लावणीला मिळाला. रात्री जेवणानंतर १० वाजता कवी संमेलन सुरु होऊन सकाळी ६ वाजता संपले.रात्रभर कवी संमेलन रंगत गेले.‌ पुस्तकावर बोलू काही‌ या कार्यक्रमात कवी गीतकार विष्णु थोरे यांनी सांगितले की,‌ गाणे लिहीण्यासाठी मिटर असावा लागतो,कातड्यापेक्षा आतड्यावर प्रेम करायला शिकले पाहिजे, काळाच्या ओघात नियतकालिके बंद होत गेली, चिंतनाच्या पातळीवर आल्यावर गाणे तयार होते.प्रत्येक कलावंता जवळ एक वेदना असते, दुःख घेऊन मिरवितो तीच तर कविता असते, गाण्यावर थिरकायला होते,तर कवितेने काळजी हलते,‌ दुस-या दिवशी सकाळ पासून दिवस भर अनेक लोक कलावंतांनी आपापल्या कला सादर केल्या.सायंकाळी या दोन दिवस चाललेल्या मनोरंजनातून प्रबोधन कार्यक्रमाचा समारोप झाला. कवी, लेखक, गीतकार सामाजिक कार्यकर्ता, विचारवंत, अभ्यासक, पत्रकार,व लोक कलावंत मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
बुधवार १५ जानेवारी २०२५
https://lokaarambh.com



## वाल्मिक कराडच्या पत्नीचं आंदोलकांना भावनिक आवाहन

बीडमधून सर्वात मोठी बातमी समोर आली आहे. आरोपी वाल्मिक कराड याच्या समर्थकाने स्वत:ला पेटवून घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे मोठी खळबळ उडाली आहे. आंदोलनातील एका तरुणाने स्वत:च्या अंगावर रॉकेल टाकलं आणि नंतर स्वत:ला पेटवून घेतलं. यावेळी इतर आंदोलकांनी त्याच्या पायाला लागलेली आग विझवण्याचे शर्थीने प्रयत्न केले. विशेष म्हणजे आंदोलक तरुणाच्या दोन्ही पायांना भयानक आग लागलेली होती. तरीही तो तरुण आक्रमकतेने घोषणाबाजी करताना दिसला. या घटनेनंतर वाल्मिक कराड यांच्या पत्नी मंजिरी कराड यांनी कार्यकर्त्यांना असं कोणतंही टोकाचं पाऊल न उचलण्याचं आवाहन केलं आहे. दरम्यान, मंत्री धनंजय मुंडे हे परळीच्या दिशेला रवाना झाल्याचीदेखील माहिती समोर येत आहे.बीडच्या केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड याच्यावर मोक्का अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संतोष देशमुख प्रकरणात वाल्मिक कराड याला आरोपी करण्यात आलं आहे. त्यामुळे वाल्मि क कराड याचे समर्थक आज दुपारपासून आक्रमक झाले आहेत. वाल्मिक कराडच्या समर्थकांनी आज परळी बंदची हाक दिली. तसेच कराडच्या समर्थकांचं आज सकाळपासून परळी पोलीस ठाण्याबाहेर ठिय्या आंदोलन सुरु आहे. तसेच बीडमध्ये ठिकठिकाणी कराडच्या समर्थकांकडून आंदोलन सुरु आहे.

# वाल्मिक कराडसाठी समर्थकाने पेटवून घेतले

## अंगाला आग, पाय जळाला; पोलीस स्टेशनबाहेरच धक्कादायक प्रकार



वाल्मिक कराड समर्थक परळीत अधिकच आक्रमक झाले आहेत. दिवसभरात तीन जणांनी अंगावर रॉकेल ओतून पेटून घेण्याचा प्रयत्न केला होता. पण नागरिकांनी त्यांना वाचवलं. पण आज रात्री वाल्मिक कराड याच्या एका समर्थकाने तर अंगाला आग लावून घेतली. या आगीत त्याचे पाय जळाले. त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पोलीस ठाण्याबाहेरच हा प्रकार घडला. त्यामुळे एकच वातावरण तापलं आहे. कराड समर्थक प्रचंड आक्रमक झाले असून जोरदार घोषणा देत आहेत.वाल्मिक कराडच्या समर्थकांचं आज सकाळपासूनच आंदोलन सुरू होतं. सुरुवातीला पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन करण्यात आलं. या आंदोलनावेळी एका कार्यकर्त्याला भोवळ आल्याचा प्रकार देखील घडला. दरम्यान वाल्मिक कराड याच्या सम र्थनासाठी सुरु असलेल्या या आंदोलनामध्ये त्याची आई देखील सहभागी झाली आहे. मात्र त्यांची देखील प्रकृती खालावली आहे. सकाळपासून तीन जणांनी अंगावर पेट्रोल टाकून पेटून घेण्याचा प्रयत्न केला.दरम्यान जेव्हा वाल्मिक कराड यांच्यावर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली, त्यानंतर कार्यकर्ते अधिकच आक्रमक झाले आहेत. परळीमध्ये बेमुदत बंदची हाक देण्यात आली आहे. टायर जाळून निषेध करण्यात आला. तसेच एका बसवर दगडफेक देखील करण्यात आली आहे. त्यानंतर आता हे आंदोलन अधिकच चिरघळलं आहे. एका कार्यकर्त्यानं चक्क पेटून घेतलं. या घटनेत तो जखमी झाला आहे, त्याच्या पायाला इजा झाली आहे, आंदोलनस्थळी जोरदार घोषणाबाजी सुरू आहे.आज वाल्मिक कराड याची सीआयडी कोठडी संपत असल्यानं त्याला सकाळी न्यायालयात हजर करण्यात आलं होतं, पुन्हा एकदा त्याच्या सीआयडी कोठडीची मागणी करण्यात आली, मात्र न्यायालयानं ही मागणी फेटाळली, त्याला न्यायालयीन कोठडी सुनावली. मात्र त्याचदरम्यान त्याच्यावर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली. वाल्मिक कराडवर म कोका अंतर्गत कारवाई केल्यानंतर त्याचा ताबा मिळावा यासाठी एसआयटीनं न्यायालयात धाव घेतली. न्यायालयाकडून एसआयटीला वाल्मिक कराडला ताब्यात घेण्याची परवानगी मिळाली आहे. त्यानंतर आता उद्या त्याला कोर्टात हजर केलं जाणार आहे.

## राजुर अर्बन संस्थेस सहकार भारतीचा मिळाला उत्कृष्ट नागरी पतसंस्था पुरस्कार



जालना प्रतिनिधी :-जालना येथील शौर्य लॉन येथे दि. ११ जानेवारी रोजी सहकार भारतीच्या ४५ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमात जालना जिल्ह्यातील सामाजिक व आर्थिक (सहकार) क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणा-या नागरी पतसंस्थांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये राजुर गणपती येथील राजुर अर्बन को ऑप क्रेडिट सोसायटी लि जालना या संस्थेस सहकार भारतीच्या ङ्ग उत्कृष्ट नागरी पतसंस्था पुरस्कारानेङ्क सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार संस्थेचे सामाजिक कार्य आणि नियामक मंडळाचे निकष पाळुन केलेल्या व्यावसायिक प्रगतीमुळे देण्यात आला. पुरस्कार राजुर अर्बनचे संस्थापक अध्यक्ष कैलास आप्पा गबाळे व व्यवस्थापक संग्राम पाटील यांनी स्विकारला. हा पुरस्कार संस्थेचे सर्व सभासद, खातेदार, संचालक मंडळ,अधिकारी,कर्मचारी व पिग्मी प्रतिनिधी यांनी केलेल्या अनमोल सहकार्यामुळे व संस्थेवर असलेल्या प्रचंड विश्वासामुळेच मि ळाला असल्याची भावना यावेळी संस्थेचे अध्यक्ष मा श्री भीमाशंकर आप्पा दारुवाले यांनी व्यक्त केली. यावेळी व्यासपीठावर मा श्री सदानंद वूईके साहेब ( विशेष लेखापरीक्षक वर्ग १ सहकारी संस्था पुणे) मा श्री गणेश निमकर (सहकार तज्ञ पुणे) मा श्री परमेश्वर वरखडे ( जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था जालना) मा श्री धनंजय चव्हाण (जिल्हा विशेष लेखापरीक्षक सहकारी संस्था, जालना) मा श्री सचिन वाणी (जिल्हा अध्यक्ष सहकार भारती जालना) मा श्री ज्ञानेश्वर काळे (महामंत्री सहकार भारती जालना) ॲड दशरथ इंगळे आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

## पाचोडच्या आठवडे बाजारात दरवळला मकरसंक्रातीचा गोडवा



पाचोड । पाचोड बाजार संक्राती सणाचे साहित्य खरेदी करतांना महिलावर्ग दिसत आहे. पावेड पररपरातील मतभेद विसरून स्नेह वृद्धिगत व्हावा बासाठी तीळगूळ घ्या गोड गोड बोला.असा संदेश देणारा मकरसंक्रांतीचा सण में मंगळवारी दि.१४ ज्वानेकरेला साजरा होणार आहे. त्यामुळे अवध्या एका दिक्सांवर आलेल्या मकरसंक्रांत सणाच्या खरेदीसाती महिलावर्गन रविवारी ता.१२ पाचोड च्या ता. पैठण येथील आठवडे बाजारात गर्दी केल्याचे दिसून आले. सुटीची पर्वगी साधत तीळगूळ, हळदी कुकवाच्या वस्तू यासह आकर्षक पतंगीच्या खरेदीसाठी बाजारपेठेत गर्दी झाली होती, यावेळी हलव्याच्या दागिन्यांच्या साजाने थटलेल्या बाजारपेठेत संक्रांतीच्या गोड पदार्थ्वांचा गोडवा दरवळत होता. यंदा मंगळवारी १४ जानेवारी) मकरसंक्रांत आहे. त्या निमिताने रविवारी सुटीचा मुहूर्त साधत महिलावर्गासह तरुणानी बाजारपेठेत गर्दी केली. बाजारातील रेडिमेड तीळगूळ, तिळाचे लाडू, चिक्की, गुळाची रेवडी, साखरफुटाणे खरेदीला यंदाही प्राधान्य देण्यात आले, तीळगूळ ११० ते धान्याचे वाण देण्याची प्रथा भारत हा कृषिप्रधान देश असून संस्कृती कृषी आहे. या दिवसात शेतात आलेल्या धान्याचे वाम एकमेकांना सिक्या देतात, हरभरे, ऊस,बोरे, ती गव्हाची ओबी, सौभाग्य वाण देवीला अर्पण करान वाण दिले जाते, अशी प्रथा आहे. खकार काही जण घरोघरी महिलांच्या हळदी कुंकवाचा कार्यक्रमाही करतात.महागाईमुळे सामान्यांचा जीव तीळतील संक्रांतीच्या सनाला तिळाएवढी माया व मुळाएवढी मोठी ठेवा, असे आवाहन करण्याची परंपरा असली तरी महागाईमुळे पारंपरिक सण साजरे कसे करायचे? आअसा पेच सामान्यांना पडत आहे. महागाईमुळे सामान्यांचा जीव टीक तीज तुटत आहे. संक्रांत म्हटली की घरोघरी तिळाचे लाडू केले जातात.

## गेवराईचे जेष्ठ पत्रकार काझी अमान यांना गौराईचा उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार प्रदान



गेवराईचे जेष्ठ पत्रकार तथा दैनिक दिव्य लोकप्रभाचे उपसंपादक काझी अमान यांना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ (मुंबई) संलग्न गौराई पत्रकार संघ, गेवराईचा वर्ष २०२४ - २५ चा मउत्कृष्ट पत्रकार पुरस्कारफ प्रदान करण्यात आला. गौराई पत्रकार संघ, गेवराईचे अध्यक्ष अंकुश आतकरे व विभागीय उपाध्यक्ष सुनिल पोपळे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. ६ जानेवारी हा हा दिवस दरवर्षी मदर्पण दिनफ म्हणून साजरा करण्यात येतो. यानिमित्त गौराई तालुका पत्रकार संघ, गेवराईच्यावतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. यामध्ये तालुक्यातील जेष्ठ पत्रकारांचा सन्मान करण्यात येतो. त्यानुसार गेवराईचे जेष्ठ पत्रकार तथा दैनिक दिव्य लोकप्रभाचे उपसंपादक काझी अमान यांना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ (मुंबई) संलग्न गौराई पत्रकार संघ, गेवराईच्यावतीने २०२४-२५ चा मउत्कृष्ट पत्रकार पुरस्कारफ संघाचे अध्यक्ष अंकुश आतकरे व विभागीय उपाध्यक्ष सुनील पोपळे यांच्या हस्ते नुकताच प्रदान करण्यात आला. यावेळी सत्काराला उत्तर देताना काझी अमान म्हणाले की, गेवराई तालुक्यामध्ये विविध पत्रकार संघ आहेत. या संघामध्ये मतभेद जरूर आहेत, परंतु मन-भेद मात्र नाहीत. हे सर्व पत्रकार विधायक कार्यासाठी एकत्र येतात, याचा मला अभिमान वाटतो. माझ्या सन्मानाबद्दल मी गौराई पत्रकार संघ, गेवराईचा आभारी आहे, असे शेवटी त्यांनी सांगितले. यावेळी वंचीत बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष पप्पू गायकवाड, शिवमुद्रा प्रतिष्ठाणचे संस्थापक अध्यक्ष अनिल आगुंडे, निर्भिड पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष अमोल कापसे, जिल्हा उपाध्यक्ष बापु गाडेकर, शहराध्यक्ष कैलास हादगुले, भागवत देशपांडे, शिवनाथ काळे, तुळशीराम वाघमारे, राजेंद्र नाटकर, सचिन नाटकर, बाळासाहेब नाटकर, रामहरी काकडे, विष्णू राठोड, गणेश वीर, अरविंद कुलकर्णी, ज्ञानेश्वर जाधव, गणेश गोरे, काझी समी यांच्यासह पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मातृभूमी प्रतिष्ठानतर्फे आंतरराष्ट्रीय योगा प्रशिक्षिका राधा तांबे यांचा आदर्श योगशिक्षक गुणवंत पुरस्कार देऊन गौरव



बीड । राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या जयंती निमित्त १२ जानेवारी रोजी मातृभूमी प्रतिष्ठान तर्फे आंबेडकर भवन बीड येथे राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळा पार पडला. यात विविध क्षेत्रातले नामांकित आणि एक निष्ठेने कर्तव्य पार पाडणारे अनेक नामवंत शिक्षकांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. अशाच योगा क्षेत्रातल्या जिल्हाभरात नामांकित आंतरराष्ट्रीय योग खेळाडू तसेच योगशिक्षिका श्रीमती राधा तांबे यांचा आदर्श योगशिक्षक गुणवंत पुरस्कार देऊन गौरव करण्यातआला. श्रीमती राधा तांबे मागील काही वर्षापासून योग प्रशिक्षण वर्ग चालवतात तसेच चराटा प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णांना योगाच्या माध्यमातून आरोग्याचे धडे देतात तसेच तुलसी वसतिगृहात विद्यार्थी आणि विद्यार्थिनींचे योग सत्र सातत्याने चालू आहेत.त्यांची योगा क्षेत्रातली आवड आणि प्राविण्यता त्यांच्या कार्यावरून आज जिल्हाभरात प्रचलित आहे. त्यांनी जिल्हा स्तरापासून ते आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत विविध स्पर्धेत पदक जिंकून त्यांचे कर्तृत्व सिद्ध केले आणि योगाला एका वेगळ्या उंचीवर घेऊन जाण्यात त्यांचे अमूल्य योगदान आहे. अवघ्या तीन वर्षांच्या लहान मुलापासून ते ७५ वर्षांच्या आजीपर्यंत त्या सर्वांना योगा शिकवण्याचे काम करत आहेत. आजच्या गुंतागुंतीच्या जीवनात आरोग्य क्षेत्रामध्ये योगाचे महत्व त्यांनी विविध प्रशिक्षण वर्ग घेऊन समाजाला पटवून देण्यात मोठा वाटा उचलला आहे. अबालवृद्धापासून ते महिलांपर्यंत आज त्या मोठ्या प्रमाणात योग प्रशिक्षण वर्ग चालवतात. त्यांच्या कामाची धडाडी आणि उत्साह पाहून योगाच्या मूल्याची जाणीव होते. अनेक बिकट प्रसंग समोर असताना त्यांनी योगाच्या माध्यमातून अतिशय उंच भरारी घेऊन केवळ राज्याचेच नव्हे तर देशाचे नाव उंच पातळीला नेले. त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. हालात के कदमो पर समंदर कभी झुकते नही टूटे हुए तारे जमीन पर कभी गिरते नाही.... त्यांचा हा प्रवास महिलांसाठी तसेच युवा वर्गासाठी नक्कीच प्रेरणादायी आणि आशावादी ठरेल.

## वाल्मिक कराडवर मकोका, धनंजय मुंडे अजित पवार यांच्या भेटीला



बीड सरपंच हत्या प्रकरणात आरोपी वाल्मिक कराड याच्यावर मकोका अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मिक कराड याला आरोपी करण्यात आलं आहे. त्यामुळे वाल्मिक कराडच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे. वाल्मिक कराड याच्या पोलीस कोठडीसाठी उद्या कोर्टात युक्तिवाद होणार आहे. यावेळी सीआयडी आणि एसआयटीची बाजू मांडणारे वकील वाल्मिक कराडला कोणत्या पुरावांच्या आधारे आरोपी केलं याची माहिती युक्तिवाद्यादरम्यान देण्याची शक्यता आहे. त्यामुळे संतोष देशम ुख यांच्या हत्या प्रकरणात वाल्मिक कराडचा रोल होता का? आणि होता तर नेमका काय रोल होता? ते आता लवकरच स्पष्ट होण्याची शक्यता आहे. एकीकडे या सगळ्या घडामोडी सुरु असतानाच मुंबईतून आणखी एक मोठी बातमी समोर आली आहे. मुंबईत मोठ्या घडामोडी घडल्या आहेत. मंत्री धनंजय मुंडे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या भेटीसाठी त्यांच्या ङ्गदेवगिरीफ निवासस्थानी दाखल झाले. वाल्मिक कराड हा धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय आहे. त्यामुळे अजित पवार आणि धनंजय मुंडे या दोन्ही नेत्यांमध्ये वाल्मिक कराड विषयी काही चर्चा होते का? ते पाहणं महत्त्वाचं आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अजित पवार यांनी धनंजय मुंडे यांच्याकडून संतोष देशमुख हत्या प्रकरणाची माहिती जाणून घेतली आहे. अजित पवार यांनी आज दुपारीच या प्रकरणावर प्रतिक्रिया दिली आहे. कुणाचीदेखील गय केली जाणार नाही. ज्याचे धागेदोरे या तपासात समोर येतील त्याच्यावर कारवाई होणार, अशी प्रतिक्रिया अजित पवार यांनी दिली आहे. दरम्यान, अजित पवारांच्या देवगिरी बंगल्यावर बैठक पार पडणार आहे. या बैठकीसाठी धनंजय मुंडे अजित पवारांच्या देवगिरी बंगल्यावर दाखल झाल्याची माहिती आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अजित पवार हे दर मंगळवारी आपल्या पक्षाच्या सर्व मंत्र्यांची आणि ज्येष्ठ नेत्यांची बैठक बोलवत असतात. अजित पवार यांच्या देवगिरी या शासकीय निवासस्थानी ही बैठक पार पडते. तशीच बैठक आज देखील आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीसाठी धनंजय मुंडे देवगिरी निवासस्थानी आल्याची माहिती आहे. दरम्यान, दोन्ही नेत्यांमध्ये बीडच्या प्रकरणावर चर्चा झाल्याची माहिती मिळत आहे. धनंजय मुंडे यांनी अजित पवारांना या प्रकरणाची माहिती दिली आहे. यानंतर आता काय-काय घडामोडी घडतात ते पाहणं महत्त्वाचं आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RA-

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com